११.०० वाजता ______ सभेस हजर असलेले सभासद

शनिवार दिनांक १५/०१/२०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२२/२३ करीता फी वाढ मंजुरीकरीता पालक शिक्षक कार्यकारी समितीची सभा आयोजित केली; या सभेकरीता पालकांना पत्राद्वारे निरोप व फोनद्वारे निरोप दिले गेले, सभेच्या सुरुवातीला मुख्याध्यापक श्री.शिंदे दिलीप यांनी प्रास्ताविक केले, व मागील सभेचा इतिवृतांत वाचुन दाखविला. यानंतर मुख्याध्यापक श्री.शिंदे दिलीप यांनी पालकांना शैक्षणिक वर्ष २०२१/२२ करीता इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी च्या फी बाबतची माहिती दिली,ती पुढीलप्रमाणे..

| अ.क्र. | इयत्ता | २०२१/२२ ची फी |
|---|---|---|
| १ | पहिली | १३,११० |
| २ | दुसरी | १३,११० |
| ३ | तिसरी | १४,२२२ |
| ४ | चौथी | १४,२६० |
| ५ | पाचवी | १४,९५० |
| ६ | सहावी | १४,९५० |
| ७ | सातवी | १४,९५० |
| ८ | आठवी | १७,२५० |

यापुढे मुख्याध्यापक श्री.शिंदे दिलीप साहेबराव यांनी पालकांना असेही सांगितले की कोविड – १९ च्या पार्श्वभूमीवर सन २०२१/२२ च्या फी मधुन पालकांना सवलत देवुन कमी फी घेतल्याचे सांगितले, ती पुढीलप्रमाणे..

| अ.क्र. | इयत्ता | २०२१/२२ ची फी | २०२१/२२ च्या फी पैकी कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर पालकांकडून आकारलेली फी |
|---|---|---|---|
| १ | पहिली | १३,११० | ९,७७५ |
| २ | दुसरी | १३,११० | ९,७७५ |
| ३ | तिसरी | १४,२२२ | १०,६२५ |
| ४ | चौथी | १४,२६० | १०,६२५ |
| ५ | पाचवी | १४,९५० | ११,०५० |
| ६ | सहावी | १४,९५० | ११,०५० |
| ७ | सातवी | १४,९५० | ११,०५० |
| ८ | आठवी | १७,२५० | १२,७५० |

यानंतर मुख्याध्यापक श्री.शिंदे दिलीप साहेबराव यांनी उपस्थित सभासदांना अशी माहिती दिली की शैक्षणिक वर्ष २०२१/२२ मधील जमाखर्चाला अनुसरुन झालेली तुट त्याचप्रमाणे पुढील अंदाजपत्रकात होणारी तुट भरुन काढण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२२/२३ मध्ये १५ % फी वाढ करणे आवश्यक आहे. १५ % फी वाढ केल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२२/२३ ची फी पुढीलप्रमाणे राहिल..

| अ.क्र. | इयत्ता | २०२१/२२ ची फी | १५ टक्के वाढ केल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२२/२३ची फी |
|---|---|---|---|
| १ | पहिली | १३,११० | १५,०७६ |
| २ | दुसरी | १३,११० | १५,०७६ |
| ३ | तिसरी | १४,२२२ | १६,३९९ |
| ४ | चौथी | १४,२६० | १६,३९९ |
| ५ | पाचवी | १४,९५० | १७,१९२ |
| ६ | सहावी | १४,९५० | १७,१९२ |
| ७ | सातवी | १४,९५० | १७,१९२ |
| ८ | आठवी | १७,२५० | १९,८३७ |

सदरील प्रस्ताव सादर केल्यानंतर सर्व सभासदांनी आपापसात विचारविनिमय करुन प्रस्तावाला मंजुरी दिली, समितीचे उपाध्यक्ष श्री.अनिल गाजरे यांनी असे सूचविले की १५ % फी वाढ करण्यास आमची मंजुरी असून जी रक्कम दिसत आहे ती राउंड फिगर मध्ये करावी, व त्यास सर्वांनी मंजुरी दिली, राउंड फिगर करुन इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीची शैक्षणिक वर्ष २०२२/२३ मधील फी पुढीलप्रमाणे..

| अ.क्र. | इयत्ता | २०२२/२३ ची फी |
|---|---|---|
| १ | पहिली | १५,००० |
| २ | दुसरी | १५,००० |
| ३ | तिसरी | १६,५०० |
| ४ | चौथी | १६,५०० |
| ५ | पाचवी | १७,००० |
| ६ | सहावी | १७,००० |
| ७ | सातवी | १७,००० |
| ८ | आठवी | २०,००० |

मुख्याध्यापक
प्राथमिक विभाग
जीवन विकास मंदिर
शिरुर, ता शिरुर, जि पुणे

वरीलप्रमाणे फी आकारण्यास सभेतील सर्व सदस्यांनी मंजुरी दिली व सर्व सदस्यांचे मुख्याध्यापक श्री शिंदे दिलीप यांनी ...